# भीमा मेगा जॉब फेअरमध्ये बेरोजगारांची झुंबड

## पश्चिम महाराष्ट्रातून मुले, मुली झाली होती दाखल : २०० कंपन्यांच्या प्रतिनिधींनी घेतल्या मुलाखती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हातात पदवी प्रमाणपत्र व इतर शैक्षणिक कागदपत्रांची फाईल, पाठीवर सॅक, नोकरीसाठी आतूर झालेले डोळे, अर्ज, मुलाखतीसाठी उडालेली झुंबड असे चित्र रविवारी येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या परिसरात दिवसभर राहिले.

निमित्त होते खासदार धनंजय महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वराज महाडिक यांच्या पुढाकाराने भीमा मेगा जॉब फेअर नावाने आयोजित नोकरी मेळाव्याचा यासाठी कोल्हापूर, सीमाभागासह पश्चिम महाराष्ट्रातील बेरोजगार तरुण, तरुणी मोठ्या संख्येने दाखल झाले होते. सुमारे दोनशे कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

भीमा मेगा जॉब फेअरला झालेल्या गर्दीमुळे विवेकानंद महाविद्यालयासमोरील रस्ता वाहनांसाठी पोलिसांना बंद करावा लागला. सकाळी बाराच्या सुमारास एकाचवेळी तरुण, तरुणी मोठ्या संख्येने आल्याने प्रवेशद्वाराजवळ ढकला ढकली झाली. मात्र, ती आटोक्यात आणली गेली.

पोलीस आणि खासगी सुरक्षारक्षकांना गर्दीवर नियंत्रण ठेवताना कसरत करावी लागली. शेवटी आयोजकांनी हस्तक्षेप करून आलेल्या मुला, मुलींना मुलाखतीच्या ठिकाणी जाण्यासाठी मदत केली. नोकरीसाठी आलेल्या प्रत्येकाचा विहीत नमुन्यातील अर्ज भरून नोंदणी करून घेण्यात आली. त्यानंतर मुलाखतीसाठी प्रवेश दिला जात होता. स्टॉल मांडून आयटी कंपन्या, हॉटेल मॅनेजमेंट, कॉल सेंटर, फौंड्री अशा विविध क्षेत्रातील कंपन्यांच्या प्रतिनिधींनी मुलाखत घेतल्या. दहावी, बारावी, आयटीआय, पदवी, पदविका, पदव्युत्तर असे शिक्षण घेतलेल्या उमेदवारांनी मुलाखती दिल्या.

### झेरॉक्स सेंटर फुल्ल

विविध कंपन्यांना मुलाखतीसाठी शैक्षणिक कागदपत्रांची झेरॉक्स प्रत द्यावी लागत होती. यामुळे आरटीओ कार्यालय परिसरातील सेंटर झेरॉक्स काढण्यासाठी आलेल्या उमेदवारांनी फुल्ल राहिले.




१) कोल्हापुरात रविवारी आयोजित भीमा मेगा जॉब फेअरला आलेल्या उमेदवारांनी विवेकानंद महाविद्यालय परिसर असा गर्दीने फुलून गेला होता. २) भीमा मेगा जॉब फेअरमध्ये खासदार धनंजय महाडिक यांच्यासोबत अनेक उमेदवारांनी असा फोटो घेतला. छाया : नसीर अत्तार

### उद्घाटनास मान्यवरांची होती उपस्थिती

जॉब फेअर उद्घाटन कार्यक्रमास स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, माजी आमदार अमल महाडिक, कोल्हापूर आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील, गोशिमाचे मोहन पंडितराव, स्मॅकचे दीपक पाटील, रघुनाथ गायकवाड, डॉ. अजय मस्के, डॉ. गजानन राशिंगकर, संजय पेंडसे, स्मिधा सरकार, विकास साहू, पी. जी. मेढे, कौस्तुभ गावडे, भागीरथी संस्थेच्या अध्यक्षा अरुंधती महाडिक, सत्यजित कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

### सकाळी लवकर उमेदवार दाखल

सकाळी नऊ वाजता जॉब फेअरला सुरुवात झाली. यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव आदी जिल्ह्यातून तरुण, तरुणी सकाळी लवकर येत राहिले. अनेक मुले, मुली उपाशीपोटी आल्याने परिसरातील चहा गाडे, हॉटेलमध्ये मिळेल त्यावर ताव मारताना दिसत होते.

> एकाच ठिकाणी अनेक कंपन्यांचे प्रतिनिधी आले होते. वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये मुलाखत देण्याची संधी मिळाली.
> **- आकाश पाटील, इस्लामपूर**

> जॉब फेअरमुळे नोकरीच्या संधी शोधणे सोपे झाले. एकाच छताखाली अनेक कंपन्यांमध्ये मुलाखत देता आली.
> **- तेजस अतिग्रे, जयसिंगपूर**

### बेरोजगारीचे भयावह वास्तव समोर

कोरोनामुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. नवीन नोकऱ्यांच्या संधी निर्माण झाल्या नाहीत. यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. भीमा जॉब फेअरला झालेल्या प्रचंड गर्दीच्या निमित्ताने बेरोजगारीचे भयावह वास्तव पुन्हा एकदा समोर आले.

## १२ हजार जणांना नोकरी : धनंजय महाडिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भीमा मेगा जॉब फेअरमध्ये नोकरीसाठी [illegible] हजार उमेदवारांनी नोंदणी केली. यापैकी १२ हजार ३०० जणांना विविध कंपन्यांमध्ये नोकरी मिळाल्याचा दावा खासदार धनंजय महाडिक यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना केला.

ते म्हणाले, बेरोजगारांना नोकरीची संधी मिळवून देण्यासाठी विश्वराज महाडिक यांनी जॉब फेअरचे आयोजन केले होते. पहिल्यांदाच घेतलेल्या जॉब फेअरला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला. फेअरमध्ये आयटी, बँकिंग, फौंड्री, कॉल सेंटरसह विविध १६० कंपन्यांचे प्रतिनिधी येऊन मुलाखती घेतल्या. मुलाखतीसाठी कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा, गोवा, बेळगाव आदी जिल्ह्यांतून उमेदवार आले होते. एकूण ३० हजार उमेदवारांनी नोंदणी केली. यापैकी पात्र असलेल्या १२ हजार ३०० जणांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. याशिवाय सात हजार जणांची प्रशिक्षणासाठी निवड झाली. यांना निवडलेल्या कंपन्यांकडून मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. आठ उमेदवारांना प्रत्येकी वार्षिक सर्वाधिक सहा लाख पगाराचे पॅकेज मिळाले. दोन हजार उमेदवारांना आज, सोमवारपासून रुजू होण्यासंबंधीचे पत्र देण्यात आले आहे. फेअरमध्ये ४७ दिव्यांगांना नोकरी मिळाली आहे. नोंदणी केलेल्या पण निवड न झालेल्यांनाही नोकरी मिळवून देण्यासाठी स्वतंत्र पोर्टल सुरू करण्यात येईल. यातून त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

विश्वराज महाडिक म्हणाले, फेअरच्या माध्यमातून बेरोजगारांना नोकरीची संधी मिळवून दिली. यापुढील काळातही असेच उपक्रम राबवले जातील. यावेळी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य आर. आर. कुंभार, कैलास मेढे उपस्थित होते.

४ पुण्यनगरी | सोमवार, २९ ऑगस्ट २०२२

# कौशल्य, इच्छाशक्ती असल्यास रोजगार संधी

## खा. धनंजय महाडिक : भीमा मेगा जॉब फेअरला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सर्वच कंपन्यांना चांगल्या आणि कौशल्य असलेल्या लोकांची गरज असते. कौशल्य आणि काम करण्याची इच्छाशक्ती असेल तर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात, असे प्रतिपादन खा. धनंजय महाडिक यांनी केले. ते भीमा मेगा जॉब फेअरच्या उद्घाटनप्रसंगी विवेकानंद महाविद्यालयमध्ये बोलत होते.

खा. महाडिक म्हणाले, भीमा मेगा जॉब फेअरमध्ये राष्ट्रीय आणि मल्टिनॅशनल कंपन्यांनी सहभाग घेतला आहे. त्यामुळे नोकरी मिळण्याची मोठी संधी कोल्हापूरवासीयांना मिळाली आहे. एकूण ३० हजार उमेदवारांनी नोंदणी केली, त्यापैकी सुमारे १२ हजारांपेक्षा अधिक तरुण-तरुणींना नोकरीची संधी मिळाली. सर्वाधिक म्हणजे वार्षिक ६ लाख रुपयांचे पॅकिज एअरटेल या कंपनीकडून ८ उमेदवारांना देण्यात आले.



भीमा मेगा जॉब फेअरमध्ये झालेली तरुणाईची गर्दी. (छाया : अर्जुन टाकळकर)

खा. महाडिक यांच्या पाठबळातून आणि विश्वराज महाडिक यांच्या संकल्पनेतून या जॉब फेअरचे आयोजन केले होते. यासाठी आयटी असोसिएशन ऑफ कोल्हापूर, वीजड्म फौंडेशन, स्कायलार्क, मेगा कॉस्प्रेल, पुण्याचे यशस्वी फौंडेशन, शिरोली मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, गोकुळ शिरगाव मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहत संघटनांचे सहकार्य लाभले.

विश्वराज, पृथ्वीराज आणि कृष्णराज महाडिक मेळावा यशस्वितेसाठी कार्यरत होते. उद्घाटनप्रसंगी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, माजी आ. अमल महाडिक, आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील, गोशिमाचे मोहन पंडितराव, स्मॅकचे दीपक पाटील, रघुनाथ गायकवाड, डॉ. अजय मस्के, कैलास मेढे, डॉ. गजानन राशिनकर, संजय पेंडसे, स्मिधा सरकार, विकास साहू, पी. जी. मेढे, कौस्तुभ गावडे, भागीरथी संस्थेच्या अध्यक्षा अरुंधती महाडिक, सत्यजित कदम यांची उपस्थिती होती.

जॉब फेअरमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ५० ते ६० कंपन्या सहभागी होत्या. पुण्याच्या जीटीटी ग्रुपच्या २१ कंपन्यांनी २ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्र दिले. नजीकच्या काळात ७ हजार तरुणांना मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन, पुन्हा नोकरीसाठी मुलाखती घेतल्या जातील, असे त्यांनी जाहीर केले.

# १२ हजार जणांना मिळाली नोकरी

## भीमा जॉब फेअरला उत्स्फूर्त प्रतिसाद; सात हजार जणांचे होणार स्किल डेव्हलपमेंट

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २८ :** एखाद्या परीक्षेतूनही अधिक धाकधूक, भीती व उत्साहात पहिल्याच भीमा मेगा जॉब फेअरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवसभरात नोंदणी केलेल्या ३० हजार उमेदवारांपैकी १२ हजार ३०० जणांना नोकरी मिळाली, तर ७ हजार मुलांची निवड स्किल डेव्हलपमेंटसाठी झाली. विवेकानंद महाविद्यालयात हा जॉब फेअर झाला. २६० कंपन्यांनी सहभाग घेत विविध क्षेत्रांत वेगवेगळ्या पदावर उमेदवारांची नियुक्ती केली.



कोल्हापूर : भीमा मेगा जॉब फेअरसाठी रविवारी विवेकानंद कॉलेज मैदानावर युवकांनी मोठी गर्दी केली होती. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

आज झालेल्या भीमा मेगा जॉब फेअरमध्ये अनेक राष्ट्रीय आणि मल्टिनॅशनल कंपन्यांनी सहभाग घेतला. त्यामुळे नोकरी मिळण्याची मोठी संधी कोल्हापूरवासीयांना मिळाली आहे, असे उद्गार खासदार धनंजय महाडिक यांनी जॉब फेअरच्या उद्घाटनप्रसंगी काढले. या ठिकाणी उमेदवारांच्या नोंदणीपासून ते मुलाखतीपर्यंतची सर्व व्यवस्था केली होती. यावेळी ४७ दिव्यांग तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध झाली असून, विविध कंपनीकडून त्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. मेळाव्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यासह, सांगली, सातारा, कोकण, कर्नाटक येथून उमेदवार आले होते.

यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, माजी आमदार अमल महाडिक, कोल्हापूर आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील, गोशिमाचे मोहन पंडितराव, स्मॅकचे दीपक पाटील, रघुनाथ गायकवाड, डॉ. अजय मस्के, कैलास मेढे, डॉ. गजानन राशिंगकर, संजय पेंडसे, स्मिथा सरकार, विकास साहू, पी. जी. मेढे, कौस्तुभ गावडे, भागीरथी संस्थेच्या अध्यक्षा अरुंधती महाडिक, सत्यजित कदम, पृथ्वीराज महाडिक, कृष्णराज महाडिक यांची उपस्थिती होती. विश्वराज महाडिक यांनी प्रास्ताविकातून जॉब फेअरबद्दलची माहिती दिली.

### दृष्टिक्षेपात

- जिल्ह्यासह, सांगली, सातारा, कोकण, कर्नाटकातून उमेदवार
- ३० हजार उमेदवारांनी नोंदणी केली
- त्यापैकी सुमारे १२ हजारांपेक्षा अधिक जणांना नोकरी
- सायंकाळपर्यंत कंपन्यांकडून उमेदवारांना नियुक्तीपत्रे दिली
- ८ उमेदवारांना सर्वाधिक वार्षिक ६ लाखांचे पॅकेज

### सॉफ्टवेअर कोडिंगने मुलाखती

बायनरी टच या कोल्हापूर स्थित युरोप व अमेरिका देशांसाठीचेसॉफ्टवेअरडेव्हलमेंटचे काम करते. या कंपनीने प्रत्यक्ष सॉफ्टवेअर कोडिंगचेप्रात्यक्षिक घेत मुलाखती घेतल्या. निव्वळ मार्क्स व प्रमाणपत्रावर आधारित मुलाखतींची परंपरा खंडित करत योग्य उमेदवाराला न्याय या तत्त्वावर घेतलेली मुलाखत या जॉब फेअरचे वेगळेपण ठरले.

तरुण भारत सोमवार, २९ ऑगस्ट २०२२



कोल्हापूर : भीमा मेगा जॉबच्या उद्घाटन प्रसंगी खासदार धनंजय महाडिक, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, माजी आमदार अमल महाडिक, प्रताप पाटील, मोहन पंडितराव, दीपक पाटील, रघुनाथ गायकवाड, डॉ. अजय मस्के, कैलास मेढे, डॉ. गजानन राशिंगकर, संजय पेंडसे, स्मिधा सरकार, विकास साहू, अरुंधती महाडिक, सत्यजीत कदम आदी.

# 'भीमा' जॉब फेअरमधून १२ हजार जणांना नोकरी

## जॉब फेअरला उदंड प्रतिसाद : ३० हजार तरुण-तरुणींची नोंदणी

प्रतिनिधी

कोल्हापूर

खासदार धनंजय महाडिक यांच्या पाठबळातून आणि विश्वराज महाडिक यांच्या संकल्पनेतून विवेकानंद कॉलेजमध्ये रविवारी आयोजित केलेल्या भीमा मेगा जॉब फेअरला उदंड प्रतिसाद मिळाला. ३० हजार तरुण-तरुणींनी नोंदणी केली होती त्यातून १२ हजारापेक्षा अधिक जणांना नोकरीची संधी मिळाली.

उद्घाटनप्रसंगी खासदार धनंजय महाडिक, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, माजी आमदार अमल महाडिक, कोल्हापूर आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील, गोशिमाचे मोहन पंडितराव, स्मॅकचे दीपक पाटील, रघुनाथ गायकवाड, डॉ. अजय मस्के, कैलास मेढे, डॉ. गजानन राशिंगकर, संजय पेंडसे, स्मिधा सरकार, विकास साहू, पी. जी. मेढे, कौस्तुभ गावडे, भागीरथी संस्थेच्या अध्यक्षा अरुंधती महाडिक, सत्यजीत कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांच्या कल्याणासाठी अनेक योजना आणल्या आहेत. त्यातून प्रेरणा घेऊन, भीमा जॉब फेअर आयोजित केल्याचे विश्वराज महाडिक यांनी नमूद केले.

खासदार महाडिक म्हणाले, सर्वच कंपन्यांना चांगल्या आणि कौशल्य असलेल्या लोकांची गरज असते. भीमा मेगा जॉब फेअर या पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या रोजगार मेळाव्याला उदंड प्रतिसाद मिळाला. १२ हजारपेक्षा अधिक जणांना नोकरीची संधी मिळाली. या उपक्रमासाठी आयटी असोसिएशन ऑफ कोल्हापूर, वीजड्म फौंडेशन, स्कायलार्क, मेगा कॉस्प्रोल, पुण्याचे यशस्वी फौंडेशन, शिरोली मॅन्यूफॅक्चरिंग असोसिएशन, गोकुळ शिरगाव मॅन्यूफॅक्चरिंग असोसिएशन, कागल – हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहत संघटनाचे सहकार्य लाभले. विश्वराज, पृथ्वीराज आणि कृष्णराज महाडिक मेळावा यशस्वितेसाठी कार्यरत होते.

सर्वाधिक वार्षिक ६ लाखांचे पॅकेज एअरटेल कंपनीकडून ८ उमेदवारांना देण्यात आले. तसेच ४७ दिव्यांगांना नोकरीची संधी मिळाली असून त्यांना संबंधीत कंपन्यांकडून मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.